पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - 17

ड प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्र.5**

**सभावृत्तांत**

दिनांक 05/10/2012 वेळ दुपारी 2.00 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि.05/10/2012 रोजी दुपारी 2.00 वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.निता पाडाळे, | अध्यक्षा, |
| 2. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| 3. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| 4. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| 5. | मा.विनय उर्फ विनायक गायकवाड | सदस्य |
| 6. | मा.विलास नांदगुडे | सदस्य |
| 7. | मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे | सदस्य |
| 8 | मा.रामदास बोकड | सदस्य |
| 9. | मा.नवनाथ जगताप. | सदस्य |
| 10. | मा.अतुल शितोळे | सदस्य |
| 11. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| 12. | मा.विमल काळे | सदस्या |
| 13.. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| 14. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| 15. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| 16. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| 17. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| 18. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| 19. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |
| 20. | मा.सोनाली जम | सदस्या |

याशिवाय मा. पी.एच.झुरे प्रभाग अधिकारी, मा. विजय इंगुळकर, प्रभारी प्रशासन अधिकारी, सभा शाखा, मा.दांगट, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.के.जी.थोरात, कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.आय.वाय.सय्यद, उपअभियंता, स्थापत्य मा.जीवन गायकवाड, उपअभियंता स्थापत्य, मा.अनिल शिंदे, उपअभियंता, स्थापत्य, मा.रामनाथ टकले, उपअभियंता स्थापत्य, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता विदयुत, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता विदयुत, मा.अजय सुर्यवंशी, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.देसले, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.एस.डी.लगस, सहा.आरोग्याधिकारी, मा. व्ही.एल.चव्हाण, सहा.आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदंनतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्र.4, दिनांक 06/09/2012 रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.1 -** प्रभाग क्र.53 वाकड येथील उदयानाला नांव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.2.-** प्रभाग क्र.53 वाकड येथील चौकाला नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.3 -** ड प्रभाग सभागृहास नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.4 -** सांगवी मधील करसंकलन विभागाचे नुतनीकरणे करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.5 -** मधुबन प्रभाग क्र.59 मधील मधुबन मध्ये नवीन पाईप लाईन टाकणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.6 -** प्रभाग क्र.59 मधुबन मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.7 -** चौकास नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आरती चोधे यांचा प्रस्ताव

**विशय क्र.8 -** वैदुवस्ती येथे कित्येक वर्षापासून जेथे कचरा टाकला जातो तो ते ठिकाणी बंद करावे व तेथे असणारी छोटीशी मुतारी बंद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.9 -** वैदुवस्ती भागामध्ये सरकारी ओपीडी सेवा वैदयकिय सेवा चालु करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव

**विषय क्र.10 -** पिंपळेगुरव येथील 9 मीटर रुंदीचा रस्ता मंजूर करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.11 -** भिमनगर येथील 18 मी. डीपी रस्त्यामधील संडास ब्लॉक व मुतारी पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक 39 विषय क्र.1
दिनांक 5/10/2012 विभाग ज स्थापत्य
सुचक - मा.विनय गायकवाड अनुमोदक - मा.प्रशांत शितोळे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र.53 मधील कावेरीनगर पोलीस वसाहतीच्या बाजूला असणा-या उदयानाला शहीद तुकाराम ओंबाने असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक 40 विषय क्र.2
दिनांक 5/10/2012 विभाग ज स्थापत्य
सुचक - मा.विनय गायकवाड अनुमोदक - मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र.53 मधील 16 नंबर रोडवरील कावेरीनगर रोडवरील चौकाला कावेरी चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 41 विषय क्र.3
दिनांक 5/10/2012 विभाग ज स्थापत्य
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

ड प्रभाग कार्यालयातील सभागृहास छत्रपती शाहू महाराज सभागृह असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 42 विषय क्र.4
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ स्थापत्य
सुचक - मा.सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

सांगवीतील करसंकलन विभागातील फर्निचर फाईल ठेवण्यासाठी असणारी साधनसामग्री फार जुनी झाली असून तिचे नवीन अदययावत फर्निचर व कॉम्प्युटरराईज करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक 43 विषय क्र.5
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ पाणीपुरवठा
सुचक - मा.सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

मधुबन प्रभाग क्र.59 मधील मधुबन भागातील गल्ली नं.9 ला पाणीच येत नाही. त्यासंदर्भात नविन पाईप लाईन टाकण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 44 विषय क्र.6
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ स्थापत्य
सुचक - मा.सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र.59 मधुबन मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 45 विषय क्र.7
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ स्थापत्य
सुचक - मा.आरती चोंधे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.आरती चोंधे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र.54 पिंपळेनिलख विशालनगर येथील महालक्ष्मी कॉम्प्लेक्स, सिल्व्हर स्पेस व गणपती मंदीर जवळील चौकास गणपती चौक व नविन विशालनगर ते बाणेर डीपीरोड वरील चोंधे पाटील लॉन्स मंगल कार्यालयाजवळील चौकास सुखकर्ता चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 46 विषय क्र.8
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ स्थापत्य
सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र.56 वैदुवस्ती या भागामध्ये वैदुवस्तीचया मुख्य रस्त्याच्या कडेला जेथे कचरा जमा करुन टाकला जातो तेथूनच वैदुवस्तीमध्ये प्रवेश केला जातो व तसेच त्याठिकाणी छोटीशी मुतारी आहे यांच्या जवळूनच भगतसिंग चौकाकडून सृष्टी हाॅटेलकडे जाणारा मुख्य रस्ता आहे. तरीसदर कचरा डेपो कुंडी चा व मुतारीचा सदर भागातील नागरीकांच्या आरोग्यास धोका आहे तरी सदर दोन्ही गोष्टी त्या ठिकाणाहून काढण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक 47 विषय क्र.9
दिनांक 5/10/2012 विभाग - आरोग्य विभाग
सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 56 वैदुवस्ती येथे आपल्या मनपाच्या ताब्यात आहे. तरी त्यामध्ये असलेल्या आराखडा हा खुप वर्षापासून वापरत नाही. तरी त्याठिकाणी ही भाग आपण आरोग्य कार्यालयासाठी मागणी केली आहे व काही भागात सरकारी ओपीडी वैदयकिय सेवा चालु करावी. सदर भागामध्ये असणा-या नागरीकांची मागणी आहे. तरी आपण त्याचा विचार करावा. तरी त्याठिकाणी त्वरीत सरकारी ओपडी वैदयकिय सेवा चालु करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक 48 विषय क्र.10
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ नगररचना
सुचक - मा.शकुंतला धराडे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.शकुंतला धराडे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखडयानुसार रामनगर सर्व्हे नं.63/1 पिंपळेगुरव येथे रामनगरच्या पुर्व बाजूस दक्षिणोत्तर 12 मीटर रुंदीचा रस्ता मंजूर करण्यात आलेला असून सदर ठिकाणी महानगरपालिका विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी म्हणजेच सन 1982-83 ते 1985-86 या काळामध्येच सर्व सामान्य कामगार वर्गातील अनेक लोकांनी एक दोन गुंठे जागा घेवून स्वतःची घरे बांधून त्याठिकाणी रहात आहेत. भविष्यात विकास आराखडयानुसार 12 मीटर रुंदीचा रस्ता करावयाचे झाल्यास अनेकांची घरे पाडावी लागतील आणि तसे केल्यास सव्र सामान्य कामगार सेवा निवृत्त बेघर होतील.

सदर रस्त्याची दक्षिणोत्तर लांबी 200 मीटर पेक्षा जास्त नसल्याने तो 12 मीटर रस्ता न करता 9 मीटर रुंदीचा रस्ता मंजूर केल्यास लोकांची गरज भागेल तसेच सव्र सामान्य कामगार बेघर होण्यापासून सुध्दा वाचतील सदर रस्त्यावर वाहतुक ही फक्त त्या परिसरातील थोडयाच लोकांची असते तरी सदर 12 मीटर रुंदीच्या रस्त्याऐवजी 9 मीटर रुंदीच्या रस्ता करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 49 विषय क्र.11
दिनांक 5/10/2012 विभाग ज्ञ स्थापत्य
सुचक - मा.प्रशांत शितोळे अनुमोदक - मा. रामदास बोकड

संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे यांचा दिनांक 5/10/2012 रोजीचा प्रस्ताव

पिंपरीवाघेरे प्रभाग क्रमांक 45 मधील भिमनगर येथे 18 मीटर रुंदीच्या डीपी रस्त्यामध्ये मनपाचा संडास ब्लॉक व मुतारी येत आहे सदर रस्त्याचे काम करावयाचे असलेमुळे सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडणे आवश्यक आहे. तरी सदर भिमनगर मधील संडास ब्लॉक व मुतारी पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-
निता विलास पाडाळे
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

जा.क्र.ड/सभा/कावि/ 33 /2012
दिनांक 29 / 11 /2012

प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका